# नियमित दिवाणी दावा नं. ६३५/२०२१ मधील नि. ४९ वरिल आदेश

CNR– MHST 070026612021

दिलीप बबन कोरडे वि. संपत दत्तात्रय सुर्यवंशी

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा दाखल करत असताना वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे कुटुंबातील कै. बबन यांचा वारस मुलगा कै. रमेश यांचे कायदेशीर वारस व बबन यांची मुलगी सौ. लता प्रकाश आरळीकट्टी यांना दाव्याचे कामी अनावधानाने सामिल करणेचे राहून गेले आहे. कै. बबन यांचे इतर वारसांना दाव्याचे कामी सामील केलेले आहे. मात्र प्रस्तुत दाव्यास कोणतीही तांत्रिक अडचण राहू नये म्हणून कै. रमेश बबन कोरडे यांना दाव्यात सामिल करुन त्यांचे वारसांना व सौ. लता प्रकाश आरळीकट्टी यांना दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दाखल करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादीने तिचे म्हणणे नि. ५१ वर दाखल करुन, सदरचा अर्ज हा खोटा व लबाडीचा असून तो फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दाव्यामध्ये सध्या पुरावा सुरु झाला असून वादीचा उलटतपास देखील नोंदविला आहे. त्यामुळे कायदेशीर तरतुदीप्रमाणे वादीस दाव्यात दुरुस्ती करुन मागता येणार नाही. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतमध्ये दाव्यात आवश्यक पक्षकार सामील नसल्याची तक्रार केली आहे, त्यानंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी उशीराने दाखल केला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्ठार्थ मा. उच्च न्यायालयाचे **राजबहादुर जयराम यादव वि. प्रकाश जयराम यादव, २०१६(२) महा.लॉ. जंनल ६४९** या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवली आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, सुचविलेली दुरुस्ती ही पक्षकारांचे वाद अंतिमरित्या

संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक असल्यास व पक्षकारांचे हक्क अधिकार निश्चीत करण्यासाठी आवश्यक असल्यास उशीराने केलेला दुरुस्ती अर्ज देखील मंजूर करणे आवश्यक आहे. याउलट प्रतिवादीचे विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादाच्या पृष्ठार्थ खालील न्यायनिवाडयावर भिस्त ठेवली आहे :-

a. **मशक गृहनिर्माण संस्था मर्या. वि. उस्मान हबीब धुका, २०१३ (२) एस.सी.सी.आर ७५** या मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच **बरेंद्र बिस्वाल वि. रामा रे, २०११ (१) सिव्हील लॉ जर्नल ३४७** यामध्ये मा. ओरिसा उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, उशीराने व पश्चात बुद्धीने दाखल केलेला दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करता येणार नाही.

b. **राधिकादेवी वि. बजरंगी सिंग, ए.आय.आर. १९९६ एस.सी. २३५८** या मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, प्रतिवादीने त्याचे कैफियतमध्ये काही मुद्दे उपस्थित केले असतील व त्यामुळे त्यास काही अधिकार प्राप्त झाले असतील, तर अशापरिस्थितीत वादीने उशीरा दाखल केलेला दुरुस्तीचा अर्ज की ज्यामुळे प्रतिवादीचे सदरचे अधिकार काढून घेतले जातील, असा अर्ज मंजूर करता येणार नाही.

c. **पवनकुमार पाठक वि. मोहन प्रसाद, ए.आय.आर. २०१६ एस.सी. २१५५** या मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, जी दुरुस्ती पक्षकारांमधील वाद अंतिमरित्या संपुष्टात आणण्याकरिता आवश्यक नाही अशी दुरुस्ती मंजूर करता येणार नाही.

d. **छबुबाई हरिभाऊ बदक वि. एस.एच.खतोड आणि सन्स, २०१० (२) सिव्हील लॉ जर्नल ५९९** यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने तसेच शिवकुमार वि. बालसुभ्रमन्यम **२०१३ (१) सिव्हील लॉ जर्नल ८५४** यामध्ये मा. मद्रास उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, कैफियत दाखल झाल्यानंतर उशीराने व दाव्याचे चौकशीचे काम सुरु झाल्यानंतर दाखल केलेला दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करता येणार नाही.

e. **नारायणआप्पा वि. बी.एस.रामास्वामी, ए.आय.आर. २०१६ एस.सी. ३६३५** या मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, ज्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार आहे अशी दुरुस्ती मंजूर करता येणार नाही.

f. **जयश्री गुहा वि शुक्ला घोष, २०१२ (३) सिव्हील लॉ र्जनल ८४३,** यामध्ये मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने तसेच **हरमेहता सिंग रारेवाला वि. जगतेश्वर प्रितसिंग रारेवाला, २०११ (१) सिव्हील लॉ र्जनल २९८,** यामध्ये मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, दाव्याचे चौकशीचे काम सुरु झाल्यानंतर दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यासाठी पक्षकाराने हे शाबीत करणे आवश्यक आहे की, योग्य परिश्रम घेवून देखील त्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीमधील बाबी या दाव्याची चौकशी सुरु होण्यापूर्वी त्यांना माहित नव्हत्या, अन्यथा सदरचा अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी तसेच खरेदीदस्त मूलतः बेकायदेशीर आहे असा जाहिर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. हिंदु कायदयानुसार वाटपाच्या दाव्यासाठी सर्व सहहिस्सेदारांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे, अन्यथा सदर दावा नामंजूर होण्यास पात्र ठरतो. वादीने प्रस्तुत अर्जात असे नमुद केले आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबातील मयत बबन याचा मयत मुलगा रमेश याचे वारस व मुलगी लता यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. वादीचे कथनावरुन मयत रमेश याचे वारस व लता हे दावा मिळकतीचे सहहिस्सेदार असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. अशापरिस्थितीत त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील न केल्यास प्रस्तुत आवश्यक पक्षकार सामील न केल्याच्या तांत्रिक बाबींवरुन दावा नामंजूर होण्यास पात्र ठरत आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात पुन्हा नव्याने दावे दाखल होवून वेगवेगळे दावे व खटले दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात आणण्याकरिता आवश्यक आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास खूपच उशीर केला आहे व सदरचा अर्ज हा वादीचा पुरावा सुरु झाल्यानंतर दाखल केला आहे. अशापरिस्थितीत वादीने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, त्याने योग्य परिश्रम घेवून देखील त्यास प्रस्तुत अर्जातील बाबी दाव्यात पुरावा सुरु होण्याअगोदर माहित नव्हत्या. त्याबाबत वादीने प्रस्तुत अर्जात काहीएक नमुद केलेले नाही. असे असले तरी, वर नमुद केल्याप्रमाणे वादीने सुचविलेली दुरुस्ती ही आवश्यक आहे. वादीला अर्जात नमुद दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच त्यामुळे प्रतिवादीचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, वादीने सदर दुरुस्ती करण्यास केलेला उशीर विचारात घेता वादीने प्रतिवादीस र.रु. १०००/– खर्च अदा करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्ज (नि.४९) मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने प्रतिवादीस र.रु. १०००/– खर्च पुढील तारखेपर्यंत अदा करणेची आहे.

३. वादी यांनी सदरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्जात नमूद दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये करुन त्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर त्याच दिवशी दाखल करावी.

BHAGWAT MAMTARAM VALIBA
Digitally signed by BHAGWAT MAMTARAM VALIBA
Date: 2025.04.22 17:41:28 +0530

स्थळ : कराड ( एम.व्ही.भागवत )

दिनांक :– २२/०४/२०२५ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.